गरीब, गरजू रुग्णांच्या अवयव प्रत्यारोपणासाठी कॉर्पस फंडातून मदत द्यावी - मंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई, दि. १६ : गरीब व गरजू रुग्णांच्या अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी शासकीय योजनेतील निधीपेक्षा अधिक खर्च येत असल्यास तो कॉर्पस फंडातून उपलब्ध करून द्यावा. त्याद्वारे राज्यातील अवयवदान आणि अवयव प्रत्यारोपण मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. सर्वसामान्य रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक मंत्रालयातील समिती कक्षात नुकतीच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

लेखा जगत

संपादक : शाम वसंत पाटील

Book - Post

Parvana(Subs.5000)/L-218/RNP-BH-91/2023-2025

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :-
साप्ताहिक लेखा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२

पान-१ ■ वर्ष : १९ ■ अंक : ४४ ■ रविवार , १० ते १६ ऑगस्ट २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत-१०/-रु.

राष्ट्रकुल पदक विजेत्या खेळाडूंची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत भेट

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची उपस्थिती

नवी दिल्ली, दि. ९ ऑगस्ट २०२६ : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतासाठी पदके जिंकणाऱ्या खेळाडूंनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७, लोककल्याण मार्ग, नवी दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्लासगो येथे पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील आपले अनुभव आणि आठवणी खेळाडूंनी पंतप्रधान मोदी यांच्यासोबत संवादातून शेअर केल्या. भारतीय खेळाडूंनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पंतप्रधानांनी सर्व पदक विजेत्यांचे अभिनंदन केले.

खेळाडूंच्या यशामुळे देशातील लाखो युवकांना क्रीडा क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. भारताच्या क्रीडा क्षेत्रातील वाढत्या कामगिरीचे कौतुक करत त्यांनी खेळाडूंना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

गावकऱ्यांच्या सहभागाने सातपुड्याचे गतवैभव पुन्हा आणता येईल : जिल्हाधिकारी रोहन घुगे

रोहन घुगे यांच्या हस्ते करण्यात आला. निमड्या येथील ५ हजार हेक्टरवर सुमारे ३ हजार ७६० वृक्षांची लागवड करण्यात येणार आहेत. सीएफआर क्षेत्रातील मजुरांना त्यांच्याच गावात VB G RAM G अंतर्गत रोजगार उपलब्ध होणार असल्याने तेथील मजुरांचे स्थलांतर थांबण्यास मदत होणार आहे.यावेळी उपवनसंरक्षक सोरव सहाय, मिशनच्या उपजिल्हाधिकारी मंजुषा घाटगे, यावल प्रकल्प अधिकारी अरुण पवार, तहसीलदार संजय ताथडे, नायब तहसीलदार आर डी पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी काळे, लोक संग्राम मोर्चाच्या प्रतिभाताई शिंदे, निमड्या येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजीविका रोजगार मिशनअंतर्गत जिल्हातील पहिला वृक्षलागवड प्रयोग निमड्या येथे; ३ हजार ७६० वृक्षांची लागवड

जळगाव, दि.१६ (जिमाका) : सामूहिक वन हक्क योजना आणि विकसित भारत आजीविका रोजगार मिशन (ग्रामीण) अंतर्गत ग्रामीण भागात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत जळगाव जिल्हात निवडण्यात आलेल्या पाच गावांपैकी रावेर तालुक्यातील निमड्या येथे वृक्षलागवडीच्या माध्यमातून जिल्हातील पहिल्या प्रयोगाचा शुभारंभ जिल्हाधिकारी

न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज भालोद येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

मुख्याध्यापक आर. एस. जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण; एन.सी.सी. विद्यार्थ्यांचे पथसंचलन ठरले आकर्षण

भालोद : न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, भालोद येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीमयवातावरणातसाजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक आर. एस. जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सेकंडरी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गणेशदादा नेहते, उपाध्यक्ष जी. डी. चौधरी, चेअरमन हेमलता ताई इंगळे, व्हाईस चेअरमन नारायण बापू चौधरी, सेक्रेटरी भास्करदादा पिंपळे यांच्यासह संपूर्ण कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेच्या परिसरात रांगोळी व फुलांच्या माध्यमातून आकर्षक सजावट करण्यात आली होती. विशेष म्हणजे शाळेच्या पटांगणात शिक्षकांनी रांगोळीच्या माध्यमातून भारताच्या भव्य नकाशाची प्रतिकृती साकारली होती. या आकर्षक नकाशासोबत सेल्फी काढण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व उपस्थित नागरिकांची उत्स्फूर्त गर्दी झाली.

कार्यक्रमादरम्यान एन.सी. सी.च्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व आकर्षक पथसंचलन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण परिसरात देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी गावकरी, माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भुसावळ व खिर्डी परिसरात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

भुसावळ व खिर्डी परिसरात ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

भुसावळ : डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल, महेश नगर, भुसावळ येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, शाळेच्या प्राचार्या अनघा पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले.

दरम्यान, जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रिकी महाविद्यालय, कृषी महाविद्यालय तसेच अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने खिर्डी शिवारातील कृषी हब येथेही स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७.३० वाजता कृषी अभियांत्रिकी व तंत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनमचंद सपकाळे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे आणि अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील शूरवीरांना अभिवादनकरतराष्ट्रनिमार्णासाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

जळगाव : गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचा ८०वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या नीलिमा चौधरी यांच्यासह गोदावरी फाउंडेशन अंतर्गत विविध महाविद्यालयांचे मान्यवर, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.स्वातंत्र्य दिनानिमित्त गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूल तसेच गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते व भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी 'नवभारत निर्मिती' आणि 'विकसित भारत अभियान' या विषयांवर आपले विचार मांडत नवकल्पनांचे सादरीकरण केले.

समाजातील प्रत्येक घटकाचा समतोल विकास हेच शासनाचे ध्येय — पालकमंत्री गुलाबराव पाटील

जनसहभागातून जळगावच्या सर्वांगीण विकासाला गती; लोककल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर भर

जळगाव, दि. १५ : समाजातील प्रत्येक घटकाला विकासाची समान संधी देण्यासाठी शासन व प्रशासन कटिबद्ध असून, शेतकरी, महिला, युवक, कामगारांसह सर्वसामान्यांच्या सक्रिय सहभागातून जळगाव जिल्ह्याच्या विकासाला गती मिळत आहे. शासनाच्या लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवून त्यांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हेच प्राधान्य असल्याचे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मुख्य शासकीय सोहळ्यात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे, महानगरपालिका आयुक्त आदित्य जीवने, उपवनसंरक्षक सौरीश सहाय, अपर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.पालकमंत्री पाटील म्हणाले की, स्वातंत्र्यवीरांच्या त्यागातून देशाला स्वातंत्र्य मिळाले, तर संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची मूल्ये दिली. या मूल्यांची जपणूक करत आपल्या कर्तृत्वातून जिल्ह्याच्या व देशाच्या विकासाला हातभार लावणे हीच आजच्या पिढीची खरी राष्ट्रसेवा आहे.

गोदावरी फाउंडेशनच्या विविध संस्थांमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रम

जळगाव : भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त गोदावरी फाउंडेशनच्या जळगाव, भुसावळ व सावदा येथील विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांमध्ये ध्वजारोहणासह देशभक्तीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडित, डॉ. चंद्रया कांते, डॉ. विजय बाविस्कर, प्रशासन अधिकारी प्रमोद भिरूड, होमिओपॅथिक महाविद्यालयाचे प्राचार्य विद्यानंद आठवले, फिजिओथेरपी महाविद्यालयाचे डॉ. जयवंत नागुलकर, गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या विशाखा गणवीर, डॉ. केतकी पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य शिवानंद बिरादर, डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. हर्षल बोरोले यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

खिर्डी शिवारातील कृषी हब येथे सकाळी ७.३० वाजता डॉ. उल्हास पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनमचंद सपकाळे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे आणि अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

जळगाव-भुसावळ महामार्गावरील पी-५१ औद्योगिक वसाहतीतील गोदावरी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, गोदावरी सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूल, गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, डॉ. वर्षा पाटील बुमेन्स कॉलेज ऑफ होम सायन्स, डॉ. वर्षा पाटील बुमेन्स कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी, डॉ. उल्हास पाटील विधी व विज्ञान महाविद्यालय, गोदावरी संगीत महाविद्यालय तसेच गोदावरी लक्ष्मी को-ऑप. बँक लि. यांच्या वतीने गोदावरी सिटी येथे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांकडून देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रम सादर केले जाणार आहेत.

गोदावरी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एच. पाटील, गोदावरी सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या निलीमा चौधरी, गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्चचे संचालक डॉ. प्रशांत वारके, डॉ. वर्षा पाटील बुमेन्स कॉलेज ऑफ होम सायन्सच्या डॉ. कविता देशमुख, डॉ. वर्षा पाटील बुमेन्स कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजीच्या संचालिका डॉ. निलीमा वारके, डॉ. उल्हास पाटील विधी व विज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. झोपे मॅडम तसेच गोदावरी लक्ष्मी को-ऑप. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक ए. टी. महाजन यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

भुसावळ : महेश नगर येथील डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलच्या परिसरात प्राचार्या अनघा पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांकडून विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

सावदा : डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल, सावदा येथेही प्राचार्या भारती महाजन यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यानिमित्त विद्यार्थ्यांकडून देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गोदावरी फाउंडेशनच्या सर्व संस्थांमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांमध्येदेशप्रेम,राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविण्याचा संदेश या कार्यक्रमांतून दिला जाणार आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त सावद्यात विठुराया आणि स्वामीनारायण मंदिरात तिरंगा श्रृंगार

सावदा : भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सावदा शहरातील विविध मंदिरांमध्ये विशेष सजावट व आकर्षक श्रृंगार करण्यात आला. गांधी चौकातील विठ्ठल मंदिरात विठुराया व रुक्मिणीमातेला भगवा, पांढरा आणि हिरवा या तिरंग्याच्या रंगांनी आकर्षक सजावट व श्रृंगार करण्यात आला होता. या सजावटीसाठी विठ्ठल मंदिराचे पुजारी तथा माजी नगराध्यक्ष राजेंद्र चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

तसेच श्री स्वामीनारायण मंदिर, सावदा येथे हरिकृष्ण महाराज व राधाकृष्ण देव यांना स्वातंत्र्यदिनानिमित्त विशेष तिरंगा श्रृंगार करण्यात आला. कोठारी स्वामी स्वयंप्रकाश दाजी यांच्या मार्गदर्शनाखाली पुजारी सत्यप्रकाश दाजी तसेच भक्तीप्रिया दासजी श्रीजी यांनी ही आकर्षक सजावट केली. या उपक्रमासाठी हरिभक्तांनीही सहकार्य केले.

तिरंग्याच्या रंगांनी सजलेले भगवानांचे हे मनोहारी स्वरूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरले. स्वातंत्र्यदिनाचा राष्ट्रीय उत्साह आणि भक्तिभाव यांचा सुंदर संगम या विशेष श्रृंगारातून अनुभवायला मिळाला.

सावदा पालिका इमारतीवर तिरंगी रोषणाई; स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

सावदा पालिका इमारतीवर तिरंगी रोषणाई; स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

सावदा : भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त सावदा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सावदा पालिका इमारतीवर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. तिरंगी प्रकाशझोतात पालिका इमारत उजळून निघाल्याने शहराच्या सौंदर्यात भर पडली.

दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता सावदा शहराच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष रेणुका राजेंद्र पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी भूषण वर्मा यांच्यासह सर्व नगरसेवक, माजी नगरसेवक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, होमगार्ड, पोलीस कर्मचारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर व नागरिकांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत स्वातंत्र्यदिनाचा उत्साह साजरा केला.

ध्वजारोहणानंतर स्वातंत्र्यसैनिकांच्यास्तंभाला नगराध्यक्ष रेणुका पाटील तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाचे स्मरण यावेळी करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पालिका परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभागी होत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेला सुरुवात; 31 ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

जळगाव : राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील इयत्ता बारावीनंतर व्यावसायिक तसेच अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन प्रवेश अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इयत्ता बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याचा कालावधी ७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. प्राप्त अर्जांची छाननी १ ते ७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. त्यानंतर ८ सप्टेंबर २०२६ रोजी पहिली निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल. पहिल्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी १८ सप्टेंबर २०२६ पर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

पात्र विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी एचएमएएस न्यू या संकेतस्थळावर प्रथम नोंदणी करावी. त्यानंतर ह्यइतर मागास बहुजन कल्याण विभाग' हा पर्याय निवडावा.

मुलांनी अर्ज भरताना 'मुलांचे शासकीय वसतिगृह, शिव कॉलनी, जळगाव', तर मुलींनी 'मुलींचे शासकीय वसतिगृह, गिरणा पाण्याची टाकी जवळ, लक्ष्मी नगर, जळगाव' हा पर्याय निवडून प्रवेश अर्ज पूर्ण भरावा.

जळगाव जिल्ह्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन विहित मुदतीत ऑनलाइन प्रवेश अर्ज करावेत.